परभणी :

दिनांक २५/०३/२०१०

# प्रेसनोट

परभणी जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपायांच्या १२९ रिक्त पदांकरीता पोलीस भरती प्रक्रिया दि. ०८/०३/२०१० रोजी पासून पोलीस मुख्यालय,परभणी येथे सुरु आहे. सदर भरती प्रक्रियेदरम्यान दि.२१/०३/२०१० रोजी १८३४ पुरुष व ८८ महिला उमेदवारांची लेखी चाचणी घेण्यात आली होती. सदरील लेखी चाचणीच्या बहूपर्यायी उत्तर पत्रिका संगणकाव्दारे (OMR) पध्दतीने तपासण्याचे काम मे.लकी फॉर्मस् प्रा.लि., मुंबई यांना सोपविण्यात आले होते. सदरील बहुपर्यायी उत्तर पत्रिकांचा निकाल दि. २३/०३/२०१० रोजी सकाळी १०.०० वा. प्रसिध्द करण्यात आला होता. बहुपर्यायी प्रश्नांच्या उत्तर पत्रिकांच्या गुणांमध्ये तफावत असल्याबाबत १२१ उमेदवारांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. बहूपर्यायी उत्तर पत्रिका संगणकाव्दारे (OMR) पध्दतीने तपासणीचे कामामध्ये मे.लकी फॉर्मस् प्रा.लि., मुंबई यांनी दि. २४/०३/२०१० रोजी कळविले की, त्यांच्याकडुन बहुपर्यायी उत्तर पत्रिका तपासणीमध्ये चुक झाली असल्याबाबतचे लेखी स्वरुपात कळविले आहे. उमेदवारांच्या प्राप्त झालेल्या तक्रारी अर्जानुसार प्रत्यक्ष छानणी केली असता संगणकाव्दारे तपासणीत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांमध्ये तफावत आढळून आल्याने सर्व उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांची मॅन्युअली तपासणी करण्यात आल्या आहेत. मॅन्युअली तपासणीमध्ये ६१३ उमेदवारांच्या गुणांमध्ये तफावत आढळुन आली आहे. आज दि. २५/०३/२०१० रोजी सर्व उमेदवारांना त्यांचे फेरतपासणी करण्यात आलेल्या बहुपर्यायी उत्तर पत्रिका पाहण्यासाठी बोलावण्यात आले होते. आतापर्यंत एकुण ७२९ उमेदवारांनी स्वतः त्यांच्या बहुपर्यायी उत्तर पत्रिका पाहुन, पडताळणी नंतर ते समाधानी झालेले आहेत. मुलाखत चाचणीकरीता पात्र उमेदवारांची यादी उद्या दि. २६/०३/२०१० रोजी संध्याकाळी १८.०० वा. पोलीस मुख्यालय, परभणी येथे प्रसिध्द करण्यात येणार आहे. दि. २३ व २४/०३/२०१० काही उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. वरिल कारणांमुळे गुणांमध्ये दिसलेल्या फरकांमुळे झालेल्या मुलाखती रद्द करण्यात आल्या आहेत. उमेदवारांच्या मुलाखत चाचणी दि. २९/०३/२०१० सकाळी ११.०० वा. पासुन पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी येथे सुरु होईल. त्याचे वेळापत्रक सर्व वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात येईल व परभणी जिल्हयाचे सर्व पोलीस ठाण्यांचे बोर्डवर लावण्यात येईल. तसेच http://www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावरील Press Release या बटणावरील जिल्हानिहाय सदराखाली प्रसिध्द करण्यात येईल.

(रघुनाथ खैरे)
पोलीस अधिक्षक,परभणी.

D:\S.B.-I\Bharati\Bharti 2009\Wireless.doc